



॥ श्री ॥

# स्तोत्रावली

डॉ. श्री. द. देशमुख यांनी लिहिलेला या ग्रंथाच्या प्रास्ताविकातील काही भाग -

आपापल्या क्षेत्रात व कालखंडात महान आणि अद्वितीय असलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्व आवाका समजावून घेण्याचा प्रयत्न करणे हे महाबिकट काम आहे. त्या सर्व व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे व कार्याचे सर्व पैलू परस्परात बेमालूम गुंफलेले असतात. आदी शंकराचार्यांच्या बाबतीत तर हे प्रकर्षाने जाणवते. बालवयातील आश्चर्यकारक बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, विचारांची परिपक्वता, ज्ञानाची अगाधता, प्रगल्भ, व प्रतिभासंपन्न बुद्धी, वैराग्य, रसिकता, वादपटुत्व, जबर आत्मविश्वास, भक्ती, योग, तंत्र, वेदांत, काव्यरचनेचे सहजकौशल्य, कल्पनावैभव, इत्यादींचा विचार केला तर हा आवाका पाहून मन अवाक् होते.

'भक्तांच्या हितासाठी वेदांताचे सार सांगणे" हा त्यांच्या अवताराचा एक हेतू त्यांच्या स्तोत्रातून त्यांनी सिद्धीस नेला आहे. स्तोत्राचा मागोवा घेतला असता स्वभावाने सगुणप्रधान असलेल्या 'स्तोत्र' या संकल्पनेत निर्गुणप्रधान वेदांत पूर्णपणे समाविष्ट केल्याचे अगदी सहज कळून येते. मूर्तीपूजा व वेदांत यांचा सहवास आचार्यांनी सुप्रतिष्ठित केला. पुढे भारतातील सर्व संतांनी हा सहवास जनमानसात कायमचा रुजविला. काही वेळा असेही घडते की मूर्तिपूजेच्या उत्साहामध्ये मूर्तीमागील तत्त्व हरवून जाते! असे होणे कोणालाच अभिप्रेत नाही.

'यशः कीर्तिः समज्ञा च स्तवः स्तोत्रं नुतिः स्तुतिः' (अमर १-६-११)

अमरकोशातील हा श्लोक स्तोत्रवाङ्मयाची पूर्ण व्याप्ती स्पष्ट करतो. ---- अशा चार प्रकारांनी स्तोत्राची रचना असते. आचार्यांनी ती अत्यंत समर्थपणे केली आहे. श्रीज्ञानदेव म्हणतात -

वाचे बरवे कवित्व। कवित्वी रसिकत्व। रसिकत्वी परतत्व। स्पर्शू जैसा॥

भगवान् विष्णूंचे अवतार असलेल्या श्रीज्ञानदेवांच्या या अपेक्षेला शंकराचे अवतार असलेल्या आचार्यांची रचना पूर्णपणे उतरते. गद्याहून पद्य मनाचा वेध घेते. पद्याला रसालंकाराची जोड असली तर ते मनाला रिझवते. रसालंकारातून परतत्व स्पर्श करून दिला तर मन आत्माकार होण्यास मदत होते. आचार्यांनी नेमके हेच साधले आहे. त्यांच्या वाङ्मयात लालित्याचे सर्व पदर स्पष्टपणे दिसतात. 'ललित' या शब्दात पुढील छटा आहेत. खेळकर, रिझविणारे, खुलविणारे, मोकळे, प्रशस्त, गोड, सुंदर, देखणे, चमकदार, लयबद्ध, फुलविणारे, चटका लावणारे, हळुवार, प्रेमळ, सरळ इ. इ.

भगवान आदिशंकराचार्यांच्या काळात ज्या ज्या देवतांच्या उपासना रूढ होत्या त्या त्या दैवतांची स्तोत्रे आचार्यांनी सारख्याच तन्मयतेने गायली आहेत. शंकर व विष्णू यासारखी दैवते, गंगा व यमुनेसारख्या नद्या, त्रिपुरसुंदरी व भवानीसारख्या देवी,

काशी व माणिककर्णिकेसारखी तीर्थे, श्रीगुरू व माया या सारखी तत्त्वे इत्यादी विविध प्रकारची स्तोत्ररचना केली. सर्वांकडे ब्रह्मबुद्धिने पाहून प्रसंगी अंतर्विरोध पत्करून सर्व देवतांकडे समत्वाने पाहण्याची दृष्टी दिली. शैव वैष्णव यातील हास्यास्पद झालेला विरोध दूर केला. दैवत समभावामुळे संप्रदाय समभाव सहजच सिद्धीला गेला. संप्रदायानुसार दैवत, क्षेत्र, नाम, ग्रंथ, यात कितीही विविधता असली तरी अद्वैत तत्त्व मानणाऱ्या सर्वांना एकत्र आणण्याचा आचार्यांनी आटोकाट प्रयत्न केला. मात्र शून्य, द्वैत व क्षणिक विज्ञान हे सत्याचे म्हणजे ब्रह्माचे स्वरूप असू शकत नाही या ठाम सिद्धान्ताचे बाबतीत त्यांनी कोणतीही तडजोड कधीही स्वीकारली नाही.

श्रीमत् आचार्यांच्या स्तोत्रात नवविधा भक्तीचे मनोज्ञ दर्शन घडते. भक्तीचे तंत्र, भावमयता व भक्तीमागील तत्त्व यांबरोबरच प्रासादिक काव्यरचना, गेयता व उत्तुंग कल्पनाविलासाचे दर्शन घडते. वेदांताला जशी रुक्षात, अष्टांगयोगाला अलिप्तता तसा भक्तीला भावुकतेचा एकसुरीपणा असू शकतो. खुले व मोकळे मन, प्रसन्न व सूक्ष्माला गवसणी घालणारे चित्त, सातत्यपूर्ण व गंभीर बुद्धी आणि विसावलेला व समर्पित अहंकार अशी अंतःकरणाची रचना होण्यासाठी स्तोत्रांची फार फार मदत होते.

श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या स्तोत्ररचनातून अनिवार्यपणे पुनरीक्ती झाली आहे. त्यामुळे काही स्तोत्रांचे अर्थ अती सविस्तर तर काहीचे अती थोडक्यात लिहिले आहेत. जागोजागी प्रमाणांसह वेदांताच्या सिद्धान्तांची यथामति स्पष्टीकरणे दिली आहेत. पौराणिक संदर्भ काही ठिकाणी टाळले आहेत.

'शिवानंदलहरीस्तोत्र' मधील काही भाग -

*दूरीकृतानि दुरितानि दुरक्षराणि दौर्भाग्यदुःखदुरहङ्कृतिदुर्वचांसि।*
*सारं त्वदियचरितं नितरां पिबंन्तं गौरीश मामिह समुद्धर सत्कटाक्षैः ॥९२॥*

ज्या पाप वर्णन करणाऱ्या शब्दांची अक्षरे सुद्धा वाईट आहेत अशी मी केलेली सर्व पापे नष्ट झाली. मला येणारा दुर्भाग्याचा व दुःखाचा अनुभव नाहीसा झाला. माझा घातक अहंकार व दुसऱ्यांच्या अंतःकरणाला घरे पाडणारी माझी बोलणी नाहीशी झाली. तुझे लीलाचरित्र हेच जीवनाचे सार आहे हे जाणून तेच सतत मी आता सेवन करीत आहे. हे गौरीशा तुझ्या कृपा कटाक्षाने आता माझा संसारसमुद्रातून उद्धार कर ॥९२॥

सर्वालङ्कारयुक्तां सरलपदयुतां साधुवृत्तां सुवर्णां। रुद्भिः संस्तूयमानां सरसगुणयुतां लक्षितां लक्षणाढ्याम्।
उद्यद्भूषाविशेषामुपगतविनयां द्योतमानार्थरेखां। कल्याणीं देव गौरीप्रिय मम कविताकन्यकां त्वं गृहाण॥९८॥
हे पार्वतीला प्रिय असणाऱ्या शंकरा, मी माझी कवितारुप कन्या तुला अर्पण करीत आहे. ती तू पदरात घे. ती सर्व प्रकारच्या श्रेष्ठ लक्षणांनी शोभत आहे. ती अशी आहे -

१) सर्वालङ्कारयुक्ताम् - उपमा, उत्प्रेक्षा, वक्रोक्ती इ.
२) सरलपदयुताम् - कवितेच्या रचनेची पदे - शब्द - सोपे - सरळ आहेत.
३) साधुवृत्ताम् - मालिनी, भुजंगप्रयात, स्त्रग्धरा इ. उत्तम वृत्तांनी नटलेली आहे.
४) सुवर्णा - कवितेतील अक्षरे सुशोभित आहेत. त्यांना यमक व अनुप्रासाची शोभा आहे.
५) रुद्भिः संस्तूयमाना - विद्वानांनी प्रशंसा केलेली.
६) सरसगुणयुताम् - माझ्या कवितेत शांत, कारुण्यादी रस असून प्रसाद, माधुर्य, गेयता इ. गुण आहेत.
७) उद्यत्भूषाविशेषाम् - आर्जव, मार्दव, लीनता इ. विशेष गुणांनी युक्त आहे.

८) उपगतविनयाम् - ती विनयशील, नर्म आहे.
९) द्योतमानार्थरेखाम्  -  तिचे पदलालित्य मोठे वाखाणण्यासारखे आहे.
१०) कल्याणी  -  प्रत्येकाच्या हृदयात असणाऱ्या भक्ती-प्रेमाचा ओलावा ती सांभाळणारी आहे.

या स्तोत्रात श्रीमद आचार्यांनी अत्यंत सुलक्षणी असलेली उपवर कन्या व स्वतःची काव्यरचना यांची अत्यंत मनोज्ञ अशी दुहेरी अर्थाची रचना केली आहे. या रचनेचा आस्वाद स्वतः वाचकानेच घ्यावा॥९८॥

'वेदसारशिवस्तोत्र'  मधील काही श्लोक -

*अजं शाश्वतं कारणं कारणानां शिवं केवलं भासकं भासकानाम्।*
*तुरीयं तमःपारमाद्यन्तहीनं प्रपद्ये परं पावनं द्वैतहीनम्॥७॥*

जो अनादी, नित्य व अजन्मा आहे, अविनाशी आहे, बीज हे फळाचे कारण असेल तर जो बीजाचेही बीजरुप कारण (आदिबीज) आहे, विमल, निरपेक्ष, सत्य व 'यस्य भासा सर्वमिदं विभाती' या श्रुतीनुसार प्रकाशकांचा प्रकाशक आहे, ज्याच्या सत्तेवर जागृती, स्वप्न व सुषुप्ती यांचा जीवाला अनुभव येतो असा जो तुरीय आहे, अज्ञानरुप अंधःकाराचाही प्रकाशक, आदि व अन्तरहित अशा सर्वश्रेष्ठ, पवित्र व भेदशून्य शंकराला मी शरण जातो. ॥७॥

*त्वत्तो जगद्भवति देव भव स्मरारे त्वय्येव तिष्ठति जगन्मृड विश्वनाथ।*
*त्वय्येव गच्छति लयं जगदेतदीश लिङ्गात्मके हर चराचरविश्वरूपिन्॥११॥*

हे मदनदाहका, विश्वनाथा, देवा तुझ्यापासून जगताची उत्पत्ती होते, तुझ्याच आनंदाच्या एका अशांवर ते आनंदी होते व स्थितिकाली टिकून राहते. हे जगन्नियंत्या, तुझ्या संकल्पानेच ते जग लयाला जाते. हे चराचर विश्वात भरून राहिलेल्या महादेवा, या विश्वाच्या अस्तित्वावरून तुझ्या 'सत्' रूप अस्तित्वाची कल्पना करता येते.॥११॥

'शिवापराधक्षमापणस्तोत्रम्'  मधील काही श्लोक –

*बाल्ये दुःखातिरेकान्मललुलितवपुः स्तन्यपाने पिपासुर्नो शक्तश्चेन्द्रियेभ्यो भव गुणजनिता जन्तवो मां तुदन्ति।*
*नानारोगातिदुःखाद्रुदितपरवशः शङ्करं न स्मरामि क्षन्तव्यो मेऽपराधः शिव शिव शिव भोः श्रीमहादेव शम्भो॥२॥*

माझ्या बालपणात अनेक तीव्र यातनांचा अनुभव आला. माझेच मल, मूत्र, ओकारी व बाहेरील शेण, माती, खरकटे इत्यादींनी माझे शरीर माखत होते. सतत भुकेने दूध पिण्याची सतत घाई असे. माझ्या इंद्रियांना त्या काळात फार कमी शक्ती होती. या प्रपंचात निसर्गतः जन्माला येणाऱ्या असंख्य जंतू, जिवाणू व विषाणूंनी मला खूप छळले. अनेक रोगांनी जी दुःखे झाली ती फार तीव्र होती व त्यांनी रडू येत होते. तेव्हा पूर्ण अज्ञानाच्या मी पारतंत्र्यात असल्याने तुझे स्मरणसुद्धा होत नव्हते. हे शिवा, महादेवा, शंभो, माझ्या अपराधांची क्षमा कर॥२॥

*आयुर्नश्यती पश्यतां प्रतिदिनं याति क्षयं यौवनं प्रत्यायान्ति गताः पुनर्न दिवसाः कालो जगद्भक्षकः।*
*लक्ष्मीस्तोयतरङ्गभङ्गचपला विद्युच्चलं जीवितं तस्मान्मां शरणागतं करूणया त्वं रक्ष रक्षाधुना॥११॥*

असे पाहा की आयुष्य रोज कमी होत असून तारुण्य लोप पावत असते. गेलेला एकही दिवस परत मिळत नाही. काळ रोज जगताला विनाशाकडे नेत असतो. पाण्यावरील तरंग जेवढ्या अल्पकाळात नाहीसा होतो, तेवढ्याच काळात संपत्ती सुद्धा

नाहीशी होते. आयुष्य विजेच्या चमकण्याप्रमाणे क्षणिक असते. यामुळे मी तुला शरण आलो असून तू माझे आता रक्षण कर.॥११॥

*करचरणकृतं वा कायजं वा कर्मजं वा श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधं।*
*विहितंविहितम् वा सर्वमेतत्क्षमस्व जय जय करुणाब्धे श्री महादेव शंभो॥१५॥*

हे शंभू महादेवा, माझे हात, पाय, शरीर, कर्म, कान, डोळे व मन यांनी केलेल्या अपराधांची मला क्षमा कर. तू करुणेचा सागर आहेस. माझ्या हातून घडलेली निषिद्ध कर्मे मनावर घेऊ नकोस. विहित कर्माचा लेप लागू देऊ नकोस. मला सर्वंकष क्षमा कर.॥१५॥

'श्रीदक्षिणामूर्त्यष्टकस्तोत्र' मधील श्लोक,

*भूरम्भांस्यनलोऽनिलोऽम्बर्महर्नाथो हिमांशुः पुमानित्याभाति चरचरात्मकमिदं यस्यैव मूर्त्यष्टकम्।*
*नान्यत्किंचन विद्यते विमृशतां यस्मात्परस्माद्विभोस्तस्मै श्रीगुरुमूर्तये नम इदं श्रीदक्षिणामूर्तये॥९॥*

येथे आचार्य दक्षिणामूर्तिची आठ रुपे सांगून त्यांचे ऐक्य लक्षात आणून देत आहेत. यातील माती, पाणी, अग्नी, वायू, आकाश, सूर्य, चंद्र व जीवात्मा = आठ. यातील माती पाणी व वायू ही अणुरेणूंनी भरलेली तत्त्वे आहेत. पोकळी हेच आकाशाचे स्वरूप आहे. त्याच्या अवकाशात सर्वांचा समावेश आहे. सूर्य व चंद्रामुळे सृष्टीचे जीवन चालते. जीवात्मा हा या सर्वांचा द्रष्टा व भोक्ता आहे. तैत्तिरीय उपनिषदात सृष्टीसर्जनाचा क्रम असा सांगितला आहे. -
आत्मा - आकाश - वायू - अग्नी - आप - पृथ्वी - औषधी - वनस्पती - जीव. या प्रत्येकात आत्मतत्त्वाने अनुक्रमे प्रवेश केला (तदनुप्राविशत). त्यामुळे आत्मतत्त्व हे या सर्वात अनुस्यूत आहे व तेच तेवढे सत्य आहे. इतर आकाशादी तत्त्वे उत्पत्ती, स्थिती व लयाच्या अधीन असल्याने अस्थिर व देश-कालाने मर्यादित आहेत. विचार केला तर चंद्रामध्ये पृथ्वीतत्व व सूर्यात अग्नी हे तत्त्व आहे. केवळ प्राणीजीवनाच्या दृष्टीने त्यांचा वेगळी तत्त्वे म्हणून उल्लेख केलेला आहे. हे व्यापक श्रीगुरो, सर्वांत अनुस्यूत असलेल्या एका आत्मतत्त्वाशिवाय दुसऱ्या कशाला व कोणाला वास्तविक अस्तित्व नाही. त्या अनुस्यूत दक्षिणामूर्ति श्रीगुरुंना मी वंदन करतो.॥९॥

'भगवन्मानसपूजा' स्तोत्रामधील श्लोक -

*पयोम्भोधेर्द्वीपान्मम हृदयमायाहि भगवन्मणिव्रातभ्राजत्कनकवरपीठं भज हरे।*
*सुचिन्हौ ते पादौ यदुकुलजन नेनेज्मि सुजलैर्गृहाणेदं दूर्वाफलजलवदर्घ्यं मुररिपो॥२॥*

हे भगवान श्रीकृष्णा, क्षीरसागरातील बेटांवर आपण नेहमी राहता, ते आपण माझ्या हृदयात आपल्याला बसण्यासाठी तेजस्वी रत्न जोडलेले सिंहासन मी ठेवलेले आहे. तुझी पद्मकमले, वज्र, अंकुश, ध्वज इत्यादी सुचिन्हांनी भूषीत असून, हे यदुकुलोत्पन्ना श्रीकृष्णा, त्या पायांचे मी उत्तम पाण्याने प्रक्षालन करीत आहे. त्या पाण्यात दूर्वा, चंदन, तुळशी, केशर इत्यादी घातलेले आहेत. हे मूर राक्षसाला ठार मारणाऱ्या श्रीकृष्णा, आपण या पाद्यपूजेचा स्वीकार करावा.॥२॥

'मोहमुद्गर (मोहाचा तडाखा)' मधील काही श्लोक -

*योगरतो वा भोगरतो वा सङ्गरतो वा सङ्गविहीनः।*

*यस्य ब्रह्मणि रमते चित्तं नन्दति नन्दति नन्दत्येव॥१९॥*

कोणी योगसाधनेत रमलेला असो की कोणी भोगात रंगलेला दिसो, कोणी संगात सापडलेला दिसो की कोणी संगरहित असो. ज्याने आपले चित्त अखंड ब्रह्मानुसंधानाने बाधित केले आहे तोच आनंदरुप आहे. सुखरूप आहे. आनंदमय जीवन जगतो. ॥१९॥
अठराव्या (मागीलच) श्लोकाला हा श्लोक एकदम छेद देणारा आहे असे वाटते. परंतु येथे आचार्यांनी परमार्थशास्त्राच्या दृष्टीने जे वास्तव आहे ते मांडले आहे. 'काय भुललासी वरीलीया रंगा' हे उभय बाजूंनी खरे आहे. योगसाधनेत रमलेला आहे असे दिसत असेल व चित्तवृत्तीचा निरोध होऊन स्वरूपात तिचे अवस्थान झाले नसेल तर तो योगही उपयोगी नाही व भोगात रंगलेला दिसताना चित्तवृत्ती ब्रह्मस्थ असेल तर भोगही बाधक होत नाही! 'अंन्तस्त्यागी बहिर्भोगी लोके विहर राघव' हा वसिष्ठांचा उपदेश व 'राम म्हणे भोगी त्यागी कर्म न लिंपे त्या अंगी' ही संत तुकाराम महाराजांची युक्ती यांचे स्वरूप सारखेच आहे. बघणाऱ्याला काय दिसते किंवा वाटते ते अगदी गौण ठरते. मात्र 'मार्गाधारे वर्तावे विश्व हे मोहोरे लावावे' या ज्ञानदेवांच्या आज्ञेप्रमाणे वागल्याशिवाय ज्ञानोत्तर लोकसंग्रह होत नाही. परमार्थाची प्रतिष्ठाही टिकून राहत नाही. तरीही शास्त्रदृष्ट्या मुक्तावर बंधन नाही.

*कस्त्वं कोऽहं कुत आयातः का मे जननी को मे तातः।*
*इति परिभावय सर्वमसारं विश्वं त्यक्त्वा स्वप्नविचारम्॥२३॥*

तू कोण? मी कोण? आपण कोठून आलो? माझे माता व पिता कोणाला म्हणावे? हे सर्व असार आहे हे लक्षात घेऊन या विश्वाचा 'हे स्वप्न आहे' असा विचार करून त्याग करावा. ॥२३॥
हे मूलगामी प्रश्न आहेत. 'मी कोणीतरी विशेष आहे' असे समजणारा प्रत्येक माणूस 'मी कोण' चे खरे उत्तर जाणीत नाही. मी देह, मी श्रीमंत, मी सत्ताधीश, मी दरिद्री इ. प्रकारे 'मी' ला जाणणारा अजाणतेपणानेच हे सर्व म्हणत असतो. 'मी ब्रह्म आहे' हे खरे उत्तर सोडून अनेकांजवळ 'मी कोण? ' या प्रश्नाची अनेक उत्तरे असतात! ब्रह्म आद्य, अनादी, नित्य, सत्य असल्याने ते येण्याचा किंवा जाण्याचा प्रश्नच येत नाही. 'आपण कोठून आलो' या प्रश्नाचे हे खरे उत्तर आहे. देहाचे आई-वडील लक्षावधी जन्मात लक्षावधी होऊन गेले. आभासिक जगाचा ईश्वर हा पिता असून प्रकृती हि माता असल्याने अनादी माता पिता तेच आहेत. तत्त्व दृष्ट्या 'मी' अज असल्याने मला मातापिता असणेच शक्य नाही. असा शास्त्रीय विचार लक्षात घेऊन आभासिक जगत् स्वप्नाप्रमाणेच मिथ्या आहे याचे सतत भान ठेवले पाहिजे. स्वप्नात जसे काहीच सार म्हणजे घेण्यासारखे, स्वीकारण्यासारखे तात्पर्य नसते तसेच या जगात काही सार नाही. ते असार आहे.

***